पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/३४१/२०२४
दिनांक -०९/०७/२०२४

**विषय : शासकीय दस्तऐवजांवर आईचे नाव बंधनकारक करण्याबाबत...**

परिपत्रक,

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२३/प्र.क्र.२५८/कार्या-२, दि. १४ मार्च २०२४ अन्वये दिनांक १ मे, २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तींच्या शासकीय दस्तऐवजांमध्ये आईच्या नावाचा समावेश वेगळ्या स्तंभामध्ये न दर्शविता उमेदवाराचे नावं आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नोंदविण्याचे बंधनकारक करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तथापि, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिका-यांचे कक्ष तसेच कर्मचा-यांच्या टेबलवरील/आसन व्यवस्थेवरील दर्शनिभागावरील नामफलकावर स्वंयस्फूर्तीने आईच्या नावाचा समावेश करावा. अधिकारी अथवा कर्मचारी नावं आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नामफलक असावे. विवाहित स्त्रियांच्या बाबतीत सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार त्यांच्या विवाहानंतरचे म्हणजे तिचे नाव नंतर तिच्या पतीचे नाव व आडनाव अशा स्वरुपात नाव नोंदविण्याची प्रक्रिया सुरु ठेवण्यात यावी. कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांचे नामफलक एकसारख्या आकाराचे राहील याची दक्षता घ्यावी.

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रति, सर्व विभागप्रमुख
प्रत, सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी